**बुलढाणा तालुक्यातील अवसायनातील सहकारी संस्थांबाबत जाहीर सूचना** >> पान 2

**कृषी विज्ञान केंद्रात विकसित भारत रोजगार हमी मिशनबाबत चर्चासत्र संपन्न** >> पान 3

**मेहकर तालुक्यात १९ हजार ६१६ घरकुलांना मंजुरी** >> पान 4

**सुविचार**


प्रत्येक मनुष्य ही राष्ट्राची दौलत आहे. - डॉ. ग.श्री. खैर


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 151 ■ मंगळवार, दि. 06 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## एक कोटी लाडक्या बहिणींना 'लखपती दीदी' करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात आतापर्यंत ५० लाख महिला 'लखपती दीदी' झाल्या आहेत. परभणी जिल्ह्यात एकट्या मेघना बोर्डीकर यांनी १ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. यावर्षी १ कोटी लाडक्या बहिणींना 'लखपती दीदी' बनवण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी परभणी येथील प्रचारसभेत दिली.

विधानसभेच्या निवडणुका झाल्या, की 'लखपती दीदी' योजना बंद केली जाईल, असा दावा विरोधकांनी केला होता. मात्र, बहुमत मिळाल्यानंतरही भाजपने ही योजना बंद केली नाही. जोपर्यंत मी मुख्यमंत्री पदावर आहे, तोपर्यंत 'लखपती दीदी' किंवा लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे फडणवीस यांनी आश्वस्त केले.

त्याचप्रमाणे परभणीच्या विकासाच्या जो आड येईल, त्याला आई प्रभादेवीच्या आशीर्वादाने त्याच ठिकाणी आम्ही नेस्तनाबूत केल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असा इशारा फडणवीस यांनी दिला. ते म्हणाले, खऱ्या अर्थाने प्रभावतीच्या या नगरीत माझी आपल्या सगळ्यांना विनंती आहे, की किती वर्षे आपण इतिहासात सांगणार आहोत? आता भविष्य तयार करण्याची वेळ आली आहे. इतिहासात जगणारे, इतिहासातच मरून जातात. इतिहास लक्षात ठेवायचा असतो, इतिहासाचा सन्मान करायचा असतो, पण भविष्याचा मार्ग हा आपल्याला कोरून काढायचा असतो. त्यामुळे येत्या १५ तारखेला कमळाची काळजी घ्या, त्यानंतर पाच वर्षासाठी 'देवाभाऊ' तुमची काळजी घेईल'', असे आवाहन त्यांनी केले.

## भाजपमध्ये जाणार? अखेर प्रणिती शिंदेंनी २४ तासानंतर सुजात आंबेडकरांना सुनावले

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूरच्या राजकारणात सध्या आरोप-प्रत्यारोपांचे वातावरण चांगलेच तापले असून प्रकाश आंबेडकरांचे सुपुत्र आणि वंचित बहुजन आघाडी युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केलेल्या वक्तव्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचारासाठी आलेल्या सुजात आंबेडकर यांनी काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर गंभीर आणि खळबळजनक आरोप केले. अखेर २४ तासानंतर प्रणिती शिंदे यांनी मौन सोडले असून आरोपावर सडेतोड उत्तर दिले आहे. वक्तव्य करताना भान ठेवा, अशा शब्दात प्रणिती शिंदे यांनी सुनावले आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत प्रणिती शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.महापालिका निवडणूक पार पडल्यानंतर प्रणिती शिंदे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा सुजात आंबेडकर यांनी केल्याने सोलापूरच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.




# बिनविरोध निवडीविरोधात MNS, काँग्रेस अखेर हायकोर्टात

## HC च्या निगराणीखाली चौकशी करण्याची मागणी; EC च्या तटस्थतेवर बोट

**दैनिक आपला विदर्भ**





**मुंबई/प्रतिनिधी :** राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना व काँग्रेसने अखेर महापालिका निवडणुकांत बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेद्वारे या दोन्ही पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या प्रकरणाची हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशी करण्याची मागणी केली आहे. विशेषतः ही चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला द्यावेत, असेही या पक्षांनी म्हटले आहे. या याचिकेवर हायकोर्ट कोणता निर्णय देते? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

राज्यात सध्या मुंबईसह २९ महापालिकांच्या निवडणुकांचा फड रंगला आहे. येत्या १५ तारखेला मतदान होणार असून, १६ तारखेला निकाल घोषित होणार आहे. पण राज्यात जवळपास ६७ ठिकाणी सत्ताधारी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्यामुळे राजकारण तापले आहे. या पार्श्वभूमीवर मनसेचे नेते अविनाश जाधव व काँग्रेस नेते समीर गांधी यांनी सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून महापालिका निवडणुकीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या याचिकेद्वारे राज्य निवडणूक आयोगाच्या तटस्थतेवरही सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

महापालिका निवडणुकीत उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांना पैसे देऊन प्रसंगी दबाव टाकून उमेदवारी मागे घेण्यास भाग पाडण्यात आले. लोकप्रतिनिधित्व कायद्यात बिनविरोध निवडीची कोणतीही संकल्पना नाही. या कायद्यात निवडून आलेले लोकप्रतिनिधी असा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे बिनविरोध विजयी उमेदवारांना पडलेल्या मतांची किमान टक्केवारी निश्र्चित केली जावी, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

### आत्ता पाहू कुठे - कुठे निवडून आलेत बिनविरोध उमेदवार?

कल्याण डोंबिवली महापालिकेत महायुतीचे सर्वाधिक २२ उमेदवार बिनविरोध निवडून आलेत. यात भाजपच्या १५, तर शिवसेनेच्या ७ उमेदवारांचा समावेश आहे. जळगावमध्येही सत्ताधारी भाजप व शिवसेनेचे प्रत्येकी ६ असे एकूण १२ उमेदवार कोणत्याही निवडणुकीशिवाय निवडून आलेत. याशिवाय भिवंडीत भाजपचे ६, तर शिवसेनेचे २ असे ८ उमेदवार बिनविरोध निवडून आलेत.

राज्य निवडणूक आयोग राज्य सरकारच्या दबावाखाली आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आलेत, त्या प्रकरणाची हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशी करण्यात यावी. तसेच ही चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणीही या याचिकेत करण्यात आली आहे.

दुसरीकडे, ठाणे महापालिकेत शिवसेनेचे ७, पनवेलमध्ये भाजपचे ६, तर १ अपक्ष असे ७ उमेदवार बिनविरोध विजयी झालेत. अहिल्यानगर येथे भाजपचे ३, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे २ उमेदवार बिनविरोधात आलेत. धुळ्यातही भाजपचे ४ उमेदवार बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आलेत. तर पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये भाजपचे प्रत्येकी २ उमेदवार विजयी झालेत. मालेगावातही इस्लामिक पार्टीचा एक उमेदवार बिनविरोध विजयी झाला आहे.

## छत्रपती संभाजीनगर साड्यांच्या सेलमध्ये तुफान गर्दी, चेंगराचेंगरीमध्ये महिला जखमी

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सणासुदीला अनेक व्यावसायिक सेलचा धमाका आणतात, यावेळी या संधीचा फायदा घेण्यासाठी महिलांची गर्दी होते, त्यात महिलांसाठी विशेषतः स्वस्तात साडी खरेदीसाठी संधी असल्यावर विचारायलाच नको. आकाशवाणी परिसरात अशाच एका दुकानदारानं महाग साडी स्वस्तात देण्याची ऑफर जाहीर केली, मग काय खरेदीसाठी नुसतीच झुंबड उडाली. अफाट गर्दीमुळं चेंगराचेंगरी झाली त्यात काही महिला बेशुद्ध झाल्याची माहिती, जवाहर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी मारोती गोरे यांनी दिली.

आकाशवाणी भागात होता सेल : मकर संक्रांतीनिमित्त साड्यांवरील मोठ्या सवलतींमुळं रविवारी छत्रपती संभाजीनगरातील आकाशवाणी ते त्रिमूर्ती चौक परिसरात प्रचंड गर्दी उसळली. पाच हजार रुपयांची साडी अवघ्या ५९९ रुपयांत मिळणार या ऑफरमुळं सुमारे हजार महिलांनी दुकानावर झुंबड घातली. दुकानात महिलांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली, दुपारी चारच्या सुमारास झालेल्या गर्दीत चेंगराचेंगरीत तीन महिला बेशुद्ध पडल्या, तर काही लहान मुले आईपासून वेगळी झाली. दुकानासमोर चपलांचा खच पडला, तरी दुकानातील गर्दी कमी व्हायचं नाव घेत नव्हती. परिस्थिती हाताबाहेर गेल्यानं पोलिसांना बोलावण्याची वेळ आली. सायंकाळी पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

## वांद्रे टर्मिनस होणार आता हाय-टेक! आता लांब पल्ल्याच्या गाड्यांचा फेऱ्या वाढणार; नेमका प्लान काय?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** पश्चिम रेल्वेच्या वांद्रे टर्मिनसमधील लांब पल्ल्यांच्या रेल्वेगाड्यांच्या देखभाल क्षमतेत मोठी वाढ झाली आहे. प्रवाशांची वाढती संख्या आणि गाड्यांची मागणी लक्षात घेऊन वांद्रे टर्मिनसमध्ये तीन नव्या देखभाल मार्गिका उभारण्यात आल्या आहेत. यामुळे रेल्वेगाड्या उभ्या करण्यासाठी अतिरिक्त जागा उपलब्ध झाली असून भविष्यात अधिक गाड्या चालवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

याआधी वांद्रे टर्मिनसमध्ये केवळ तीन देखभाल मार्गिका होत्या. मात्र, आता नव्या तीन मार्गिकांची भर पडल्याने एकूण सहा मार्गिकांवर गाड्यांची देखभाल केली जाऊ शकते. या नव्या मार्गिकांवर रेल्वेगाड्या धुण्याची अत्याधुनिक सुविधाही उपलब्ध आहे. प्रत्येक मार्गिकेची लांबी ५४० मीटर असून त्या २४ डब्यांच्या प्रवासी गाड्यांसाठी उपयुक्त आहेत. एलएचबी, आयसीएफ तसेच अन्य सर्व प्रकारच्या डब्यांची देखभाल येथे केली जाणार आहे.

सध्या वांद्रे टर्मिनसमधील कोचिंग डेपोत सुमारे ८०० डब्यांची देखभाल केली जाते. एलएचबी डब्यांची देखभाल दर ३६ महिन्यांनी तर आयसीएफ डब्यांची देखभाल दर १८ महिन्यांनी केली जाते.

रेल्वे टर्मिनसची क्षमता वाढवण्यासाठी मुंबई सेंट्रल आणि वांद्रे टर्मिनस येथे नव्या मार्गिकांचे काम सुरू आहे तसेच वापरात असलेल्या फलाटांची लांबी वाढवण्याचे कामही प्रगतीपथावर आहे. जोगेश्वरी आणि वसई रोड येथे उभारण्यात येणाऱ्या नव्या टर्मिनसचे काम अंतिम टप्प्यात आहे.

या तीन नव्या मार्गिकांपैकी पहिली जुलै २०२४ मध्ये वापरात आली होती, तर उर्वरित दोन मार्गिकांचे काम डिसेंबर २०२५ मध्ये पूर्ण झाले आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी ५६ कोटी ७६ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. या नव्या मार्गिकांमुळे भविष्यात अतिरिक्त नऊ लांब पल्ल्यांच्या रेल्वेगाड्यांची हाताळणी शक्य होणार आहे.

# शेतकऱ्यांसाठी गुड न्यूज! राज्यातील १६ कृषी बाजारसमित्यांचे होणार राष्ट्रीयकरण

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतीमालाच्या बाजारव्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणाऱ्या निर्णयाच्या दिशेने राज्य शासनाने आणखी एक पाऊल टाकले आहे. महाराष्ट्रातील प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा (ई-नाम अंतर्गत) देण्याचा निर्णय यापूर्वीच जाहीर करण्यात आला होता. आता या निर्णयाला गती देत विधी व न्याय विभागाने संबंधित गॅझेट अधिसूचना प्रसिद्ध केली असून, कोल्हापूरसह राज्यातील सोळा बाजार समित्यांची सविस्तर माहिती पणन विभागाकडून मागवण्यात आली आहे. त्यामुळे या समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याबाबतचा अंतिम निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता बळावली आहे.

राज्य शासनाने राष्ट्रीय दर्जा देण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी संबंधित बाजार समित्यांकडून शेतीमालाच्या वार्षिक आवकेची सविस्तर आकडेवारी मागवली आहे. या अंतर्गत वर्षभरात बाजार समितीत येणाऱ्या एकूण शेतीमालाची आवक, तसेच इतर राज्यांतून येणाऱ्या शेतीमालाचे प्रमाण किती आहे, याची माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार संबंधित बाजार समित्यांनी ही माहिती सहकार व पणन विभागाकडे पाठवली आहे.

राज्य शासनाने या आधीच बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यासाठी कायद्यात आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या आहेत. सुधारित निकषांनुसार, ज्या बाजार समित्यांमध्ये वार्षिक ८० हजार टनापेक्षा अधिक शेतीमालाची आवक होते, अशा एकूण ५१ बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील सोळा बाजार समित्यांचा समावेश करण्यात आला असून, उर्वरित समित्यांचा समावेश पुढील टप्प्यांमध्ये होणार आहे.

या सोळा बाजार समित्यांकडून २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षातील शेतीमाल आवकेची सविस्तर माहिती मागवण्यात आली होती. संबंधित समित्यांनी ही माहिती शासनाकडे सादर केल्यामुळे आता निर्णय प्रक्रियेला वेग आला आहे. शासन स्तरावर सुरू असलेल्या हालचाली पाहता, या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याबाबतचा अधिकृत निर्णय येत्या काळात जाहीर होण्याचे संकेत मिळत आहेत.

राष्ट्रीय दर्जा देण्यामागे शासनाचा मुख्य उद्देश म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाला योग्य आणि स्पर्धात्मक दर मिळवून देणे हा आहे. ई-नाम प्रणालीमुळे देशभरातील खरेदीदारांना एका डिजिटल व्यासपीठावर जोडले जाईल. यामुळे शेतमालाच्या विक्रीत पारदर्शकता वाढेल, लिलाव प्रक्रियेत स्पष्टता येईल आणि शेतकऱ्यांना अधिक बाजारपेठा उपलब्ध होतील. तसेच एक देशव्यापी परवाना आणि एकसमान शुल्क प्रणाली लागू झाल्याने व्यापाऱ्यांनाही व्यवहार सुलभ होणार आहेत.

### कोणत्या बाजारसमित्यांचा समावेश होणार?

या प्रक्रियेत ज्या बाजार समित्यांकडून माहिती मागवण्यात आली आहे, त्यामध्ये कोल्हापूर, नाशिक, पुणे (ग्रामीण), छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, बुलढाणा, ठाणे, जळगाव, जालना, सांगली, वाशिम, अकोला, अहिल्यानगर, लातूर, सोलापूर आणि नागपूर या प्रमुख बाजार समित्यांचा समावेश आहे.

# हिंमत असेल तर समोरुन लढा, संजय राऊतांचं एकनाथ शिंदेंना थेट आव्हान

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तयारीचा जोर संपूर्ण राज्यात वाढला असून, मुंबईमध्ये वेगवेगळ्या विषयांवरून वातावरण तापत असल्याचं पाहायला मिळतंय. ठाण्यातील उमेदवार पळवल्याच्या प्रकरणावर शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आज टीका केलीय. ''हिंमत असेल तर समोरून लढा,'' अशा शब्दांत राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना आव्हान दिलं असून, पोलिसांच्या भूमिकेबाबतही सवाल उपस्थित केलाय. संजय राऊत यांनी मुंबईत माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

मनसे उमेदवाराच्या व्हिडिओमुळे राजकीय वातावरण तापलंय : राज्यातील महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सध्या सुरू असताना ठाण्यातील मनसे उमेदवाराबाबत समोर आलेल्या व्हिडिओमुळे राजकीय वातावरण चांगलंच तापलंय. या प्रकरणावर संजय राऊतांनी विशेष भाष्य करत म्हटले की, एकनाथ शिंदेंमध्ये हिंमत आणि मर्दानगी असेल, तर त्यांनी पाठीमागून खंजीर खुपसण्याचे उद्योग थांबवून समोरून लढावे, असे खुले आव्हान संजय राऊत यांनी दिलंय. संजय राऊतांनी गलिच्छ राजकारणाबद्दल चीड व्यक्त करत तुम्ही आमचा पक्ष चोरला, चिन्ह चोरलं, तरी आम्ही खंबीरपणे लढतोय. पण आता तुम्हाला मशाल आणि इंजिनची इतकी भीती वाटू लागली आहे की, समोरच्या उमेदवाराने निवडणूक लढवूच नये, यासाठी तुम्ही प्रयत्न करीत आहात. हा सर्व प्रकार तुम्ही घाबरला आहात हेच सिद्ध करतो, असंही संजय राऊत म्हणाले.

लोकांच्या मनात या गलिच्छ राजकारणाबद्दल प्रचंड चीड : तसेच १०-१५ हजार रुपये वाटून किंवा उमेदवार पळवून मुंबई-ठाण्यातील मतदारांचं मत परिवर्तन होईल हा सत्ताधाऱ्यांचा भ्रम आहे. लोकांच्या मनात या गलिच्छ राजकारणाबद्दल प्रचंड



चीड आहे आणि ही चीड मतपेटीतून नक्कीच बाहेर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केलाय. दरम्यान, मुंबईत बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा झाकल्याच्या मुद्द्यावर संजय राऊतांनी निवडणूक आयोगाला 'मूर्ख' म्हटलंय. ते म्हणाले, ''बाळासाहेब ठाकरे हे राष्ट्रपुरुष आहेत. जर त्यांचा पुतळा झाकला जात असेल, तर मुंबईतील अटल बिहारी वाजपेयींचे पुतळे का झाकले जात नाहीत? बाळासाहेबांची भीती शिंदे आणि फडणवीस यांच्या मनात आहे. पण एक पुतळा झाकून काय होणार? आज सर्वच पक्ष त्यांचे फोटो वापरत आहेत.''

काम करण्यासाठी पोलिसांवर नक्कीच दबाव : त्याचबरोबर त्यांनी मनसे नेते अविनाश जाधव यांनी प्रसिद्ध केलेल्या एका व्हिडिओचा संदर्भ दिलाय. संजय राऊत म्हणाले की, हा प्रकार लोकशाहीसाठी घातक आहे. पोलीस उमेदवारांच्या घरात जातात, त्यांना गाडीत टाकतात आणि थेट उपमुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातील निवासस्थानी घेऊन येतात. हे काम करण्यासाठी पोलिसांवर नक्कीच दबाव किंवा धमक्या असाव्यात. पोलिसांनी त्यांचे काम इमानदारीने केले असले तरी हे चित्र संतापजनक आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. या प्रकरणावर निवडणूक आयोग काहीही ठोस कारवाई करणार नाही. आयोग फक्त अहवाल मागवेल आणि चौकशीचे आश्वासन देऊन वेळ काढेल. त्यामुळे अन्यायाविरुद्ध न्यायालयात जाणे हाच योग्य मार्ग उरला आहे, असा दावा त्यांनी केला.

## वास्तविकता अन् ठाकरेंचा कांगावा...

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि शरद पवार यांनी एकत्र येत 'शब्द ठाकरेंचा' या नावाने संयुक्त वचननामा जाहीर केला. राजकारणात प्रतीके, भावना आणि ब्रॅण्ड यांना अनन्यसाधारण असेच महत्त्व मात्र, निवडणूक जाहीरनामा हा शहराच्या विकासाचा पुढील पाच वर्षांचा आराखडा असतो. मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीसाठी तर हा आराखडा अधिक जबाबदारीने, अधिक अभ्यासपूर्ण पद्धतीने आणि वास्तवाला धरून असणे अपेक्षित असते. दुर्दैवाने, 'शब्द ठाकरेंचा' हा तथाकथित वचननामा वाचल्यानंतर, या अपेक्षांचा संपूर्ण भंग झाल्याचे प्रकर्षाने जाणवते. विशेष म्हणजे, हा वचननामा सेनाभवनात प्रसिद्ध करण्यात आला. तब्बल २० वर्षांनंतर यानिमित्ताने राज ठाकरे हे सेनाभवनात दाखल झाले. इतक्या वर्षांनंतर येथे येताना 'तुरुंगातून सुटून आल्यासारखी' भावना असल्याचे राज यांनी म्हटले असून, ते पुरेसे बोलके आहे! उद्धव ठाकरे यांनी यावेळी केंद्र सरकार आणि भाजपवर अनाठायी टीका केली. 'आमच्या कामाचे श्रेय घेण्याऐवजी पंतप्रधान मोदी यांनी कैलास पर्वत बांधला आणि गंगा नदी आणली, याचे श्रेयही भाजपनेच घ्यावे,' असा उपहासात्मक टोमणा त्यांनी मारला. बाकी, आपल्या राजकीय कारकिदत टोमणे मारण्याशिवाय त्यांनी बाकी काय वेगळे केले म्हणा! या वचननाम्यात महानगरपालिकेच्या अधिकारक्षेत्राबाहेरील अनेक घोषणा करण्यात आल्याचे दिसते. यातील काही विषय हे केंद्र, तसेच राज्य सरकारच्या अखत्यारीत येतात. म्हणजेच पुन्हा ही आश्वासने केंद्र आणि राज्य सरकारमुळे पूर्ण करता आली नाहीत, असा कांगावा करायला हे दोन्ही ठाकरे मोकळे. अर्थातच, ठाकरे बंधूंना मुंबईकरांनी जर कौल दिला, तरचा हा प्रश्न. त्याचबरोबर काही जुनीच आश्वासने नव्या शब्दांत पुन्हा एकदा देण्यात आली आहेत. 'ओल्ड वाईन इन न्यू बॉटल,' असे म्हणतात या प्रकाराला. बाकी ठाकरेंनी आजपर्यंत हेच तर काम केले आहे. दै. 'मुंबई तरुण भारत'ने या वचननाम्याचा यथायोग्य असा पंचनामा शनिवार दि. ३ जानेवारी रोजीच्या मुंबई आवृत्तीत यापूवच केलेला आहे. त्यामुळे हा वचननामा जाहीर झाल्यानंतर आश्चर्याचा धक्का बसण्याचे काहीही कारण नव्हते. या वचननाम्याचे नाव 'शब्द ठाकरेंचा' असे असले, तरी त्या शब्दांमध्ये मुंबईकरांचा आवाज कुठे आहे, हा खरा प्रश्न! जणू हा जाहीरनामा मुंबईसाठी नसून, केवळ ठाकरेंच्या प्रचारासाठीच लिहिला गेला आहे. आदित्य आणि अमित ही दोन्ही ठाकरेंची पुढील पिढी, हे मान्य. मात्र, मुंबई महानगरपालिका ही ठाकरेंच्या दावणीला बांधलेली खासगी संस्था नसून, ती देशाच्या आर्थिक राजधानीची महानगरपालिका आहे. त्याची निवडणूक लढवताना, ठाकरेंनी मुंबईच्या भविष्यासंदर्भात आपली स्पष्ट भूमिका मांडणे अपेक्षित होते. तसे न होता, पुन्हा एकदा राजकीय टोमणे आणि भावनिक भाषणांपुरतेच हे सादरीकरण मर्यादित राहिले. राज ठाकरे शहरीकरण, शहरांचे सौंदर्य, नियोजन याबाबत आपणच जाणकार असल्याचा दावा सातत्याने करत आले आहेत. काही वर्षांपूव त्यांनी मुंबईच्या विकासाची 'ब्ल्यू प्रिंट'ही सादर केली होती मात्र, या संयुक्त वचननाम्यात शहरी नियोजनाबाबत एकही ठोस, नोंद घेता येईल, असे आश्वासन नाही. शहरी सौंदयकरण म्हणजे काय, सार्वजनिक जागांचा विकास कसा करणार, पादचारी, सायकलस्वार, सार्वजनिक मोकळ्या जागा यांचा विचार कसा करणार, यावर त्यांनी सोयीस्कररित्या मौन पाळले आहे. या वचननाम्यात मुंबईच्या वाहतुकीचाही विचार करताना केवळ 'बेस्ट'पुरतेच विषय मर्यादित ठेवण्यात आले आहेत. मेट्रो, उपनगरी रेल्वे, जलवाहतूक, पार्किंग धोरण, वाहतूक व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर, ठोस भूमिका मांडलेली नाही. पर्यावरणाच्या नावाने आंदोलन उभे करणाऱ्या ठाकरे बंधूंनी या वचननाम्यात, मिठी नदीची अवस्था, पावसाळ्यातील पूरस्थिती, नाल्यांची स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन यावर कोणतीही ठोस भूमिका नाही. पर्यावरण म्हणजे फक्त झाडे आणि जंगल एवढेच नसते. नद्या, नाले, समुद्रकिनारे हेही त्याचाच अविभाज्य भाग आहेत, हे बहुधा विस्मरणात गेलेले दिसते. विकासाच्या बाबतीतला उद्धव यांचा गोंधळ पुन्हा एकदा जाणवतो. मुंबईतील मराठी शाळांचा प्रश्न गंभीर असाच. मराठी माध्यमाच्या शाळा मोठ्या संख्येने बंद पडत आहेत, विद्यार्थ्यांची संख्या घटत असून, या शाळांतील शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित आहेत. मात्र, स्वतःला 'मराठी अस्मितेचे रखवालदार' म्हणवणाऱ्या ठाकरे बंधूंच्या वचननाम्यात, मराठी शाळांच्या पुनरुज्जीवनाचा साधा उल्लेखही नाही! मराठा अस्मितेवर व्यासपीठावर 'टाळ्यांची वाक्ये' घ्यायची, प्रत्यक्ष धोरणात मात्र हीच अस्मिता बासनात गुंडाळून ठेवायची, हेच ठाकरेंचे धोरण राहिले आहे. वचननाम्यातून ते ठळकपणे समोर येते, इतकेच. मुंबईचे समुद्रकिनारे, डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न, कचरा व्यवस्थापन, पुनर्वापर, या विषयांवरही यात भाष्य नाही. शहराच्या आरोग्याशी आणि पर्यावरणाशी निगडित असलेल्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे, केलेले दुर्लक्ष हे गंभीर असेच. संजय राऊत यांनी ठाकरे परिवाराचा 'हिंदू अनडिव्हायडेड फॅमिली' असा उल्लेख केला आहे तसेच असेल, तर मग २० वर्षे ठाकरे कुटुंब विभागलेले का होते? याचे उत्तरही त्यांनीच द्यावे. स्वतः मुंबईत केलेली कामे सांगण्यासारखी नसल्यामुळेच उद्धव ठाकरे यांना मोदी, फडणवीस आणि भाजपवर टीका करावी लागत आहे. विकासावर बोलण्याऐवजी उपहासावर भर देणे, हे कमकुवतपणाचेच लक्षण. एकूणच हा वचननामा मुंबईसाठी नाही, मुंबईकरांसाठी नाही, तर केवळ एका घराणेशाहीचे राजकीय अस्तित्व कायम ठेवण्यासाठीचा निकराचा प्रयत्न आहे. तथापि, हा प्रयत्न फसलेलाच आहे. मुंबईला 'व्हिजन' हवे आहे, योजना हव्यात, धाडसी निर्णय हवेत. भावनिक घोषणा आणि राजकीय टोमणे मुंबईकरांच्या प्रश्नांचे उत्तर ठरू शकत नाही. त्यामुळे 'शब्द ठाकरेंचा' हा वचननामा मुंबईच्या विकासाचा दस्तऐवज म्हणून नव्हे, तर 'संधी असूनही न वापरलेली संधी' म्हणूनच इतिहासात ओळखला जाण्याची शक्यता अधिक. मुंबई, मराठी माणूस आणि मराठी अस्मिता यांच्या नावाने गळे काढणाऱ्यांना वचननाम्यातही या मराठीचाच विसर पडला, हे मुंबईकर आणि मराठी माणसाचे दुर्दैव, असे खेदानेच नमूद करावे लागेल.

# बुलढाणा तालुक्यातील अवसायनातील सहकारी संस्थांबाबत जाहीर सूचना

## ३६ संस्थांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा तालुक्यातील विविध सहकारी संस्था दीर्घकाळापासून अवसायनात असून, त्यांच्या नोंदणी रद्द करण्याची वैधानिक प्रक्रिया सहकार विभागाकडून सुरू आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये सदर कार्यवाही करण्यात येत असून, संबंधित संस्थांचे व्यवहार अधिकृतपणे बंद करण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची पायरी आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ८९ (४) नुसार, अवसायनात असलेल्या सहकारी संस्थांविरुद्ध ज्या कोण्या व्यक्ती, संस्थांचे विरुद्ध काही दावे असतील, त्यांनी जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत आपले दावे लेखी स्वरूपात, पुराव्यासह संबंधित नोंदणी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. सहकार विभागाने स्पष्ट केले आहे की, ठराविक कालावधीत कोणताही दावा किंवा लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास, त्यानंतर सादर होणाऱ्या दाव्यांची दखल घेतली जाणार नाही. तसेच अशा उशिरा दाखल होणाऱ्या दाव्यांची जबाबदारी सहकार विभाग अथवा संबंधित अवसायकावर राहणार नाही.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार या सर्व संस्थांना अंतिम अवसायनात घेण्यात आले आहे. संबंधित संस्थांवर अवसायकाची नियुक्ती यापूर्वीच करण्यात आली असून, संस्थांची मालमत्ता, देणी-घेणी व कागदपत्रांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित वैधानिक बाबी पूर्ण झाल्यानंतर नोंदणी रद्द करण्याची अंतिम कार्यवाही केली जाणार आहे.

नोंदणी रद्द होण्याच्या प्रक्रियेत बुलढाणा तालुक्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचा समावेश आहे. यामध्ये जि.प. माध्य. शिक्षक व कर्मचारी सह. पत बुलडाणा र.न.२०४, सिंगगड गृहनिर्माण सह.संस्था म. बुलढाणा, सन्मित्र शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्म. सह. पतसंस्था. म. बुलडाणा ३१०, औंदुबर गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, पिपल्स अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसा.म. बुलडाणा र.न.३१, सिंधुदुर्ग गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, विवेकानंद नागरी सहकारी पत संस्था, म.बुलडाणा र.न.३२२, लो-इन. गृप गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, शिवप्रताप ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्था म. बुलडाणा, शिवाजी गृहनिर्माण सहकारी संस्था म. बुलडाणा, भाग्योदय ग्रामिण बिगर शेती सह. पत संस्था. म. देऊळघाट र.न.३३८, तिरुपती नं.१ गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, धनलक्ष्मी नागरी सहकारी पत संस्था, म.बुलडाणा र.न.३४३, माँ.जगदंबा आदिवासी उपसा जलसिंचन सह. संस्था, कामेश्वर ग्रामिण बिगर शेती सह. पत संस्था, म. वरवंड र.न.३५२, आदर्श सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह.संस्था म.बुलडाणा, विदर्भ नागरी सहकारी पत संस्था, म. बुलडाणा र.न.३५८. जगदंबा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह.संस्था म.बुलडाणा, जयजवान जय किसान सहकारी ग्राहक भांडार, लोक कल्याणी महिला नागरी सहकारी पत संस्था. म. बुलडाणा र.न.३६०, अहिल्या पगारदार सेवकांच्य सहकारी पतसंस्था म. बुलडाणा, महात्मा ज्योतीबा फुले ग्रामिण बिगर शेती सह. पतसंस्था म. रायपूर, प्रियदर्शनी महिला नागरी सहकारी पतसंस्था म. बुलडाणा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मा. औद्यो.सह.संस्था म. बुलडाणा, शेतकरी गृहनिर्माण सह.संस्था म. बुलडाणा, जिजाऊ महिला ओद्यो. सह.संस्था म. बुलडाणा, राजे छत्रपती हमाल कामगार सह. संस्था म. बुलडाणा, जगदिश्वर गृहनिर्माण सहकारी संस्था, म.बुलडाणा र.न. ३५४, व्यंकटेश गृहनिर्माण सहकारी संस्था, म.माळविहीर र.न.३४६., तारकेश्वर गृहनिर्माण सहकारी संस्था, म.बुलडाणा र.न.३५५, तिरुपती गृहनिर्माण सहकारी संस्था, म.माळविहीर र.न.३४७, गगनगिरी गृहनिर्माण सहकारी संस्था, म.बुलडाणा र.न.३५६, व्यंकटेश १ गृहनिर्माण सहकारी संस्था, म.माळविहीर र.न.३४९, स्वस्तिक शॉ ॲण्ड फ्लैट ओनर्स को. ऑप. हाऊ. सो. लि. बुलडाणा र.न.३७९, बालाजी १ गृहनिर्माण सहकारी संस्था, म.माळविहीर र.न.३५, ममलेश्वर गृहनिर्माण सहकारी संस्था, म.बुलडाणा र.न.३५३ अशा एकूण ३६ सहकारी संस्था या कारवाईच्या कक्षेत आहेत.

सहकार विभागामार्फत ही जाहीर सूचना अधिकृत सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध करण्यात आली असून, संबंधित सर्व सभासद, हितसंबंधित नागरिक, कर्जदार व ठेवीदार यांनी या सूचनेची गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत दावा सादर न केल्यास भविष्यात कोणतीही तक्रार अथवा मागणी ग्राह्य धरली जाणार नाही, असेही विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## पार्थ पवारांशी निगडीत जमिनीचा आणखी एक घोटाळा; विजय कुंभार यांचा गौप्यस्फोट, नेमकं प्रकरण काय?

**मुंबई/प्रतिनिधी :** डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन ही १९३६ साली स्थापन झालेली संस्था आहे. या संस्थेच्या अर्ध्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालय उभे आहे. धर्मादाय आयुक्तांनी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन या संस्थेला त्यांची जागा भाड्याने देण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र संस्थेच्या विश्वस्तांनी ती जागा विकली, असा खळबळजनक आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांची शिवाजीनगरमध्ये ज्या इमारतीमध्ये पत्रकार परिषद झाली. त्या इमारतीसंदर्भात विजय कुंभार यांनी आज पत्रकार परिषद घेऊन अनेक गौप्यस्फोट केले.

डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन या संस्थेची जागा विकसित करण्यासाठी संस्थेने साहिल प्रधान या व्यक्तीला पॉवर ऑफ अटर्नी दिली. हा साहिल प्रधान तोच आहे जो मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात अमेडिया कंपनी आणि शितल तेजवानी यांच्यात जो करार झाला. त्या व्यवहारांत साहिल प्रधान हा साक्षिदार आहे. यातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा या प्रकरणातील सहभाग दिसून येतोय, असा गौप्यस्फोटही विजय कुंभार यांनी आज पत्रकार परिषद घेऊन केला. कल्पवृक्ष प्लांटेशन या कंपनीने ही जागा विकसित केलीय. तसेच



कल्पवृक्ष प्लांटेशन कंपनीचे संचालक आणि सुनेत्रा पवार या इतरही कंपन्यांमध्ये एकत्रित संचालक आहेत, असंही विजय कुंभार यांनी सांगितले. सदर जागा साठ वर्षांच्या भाड्याने देण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात या जागी विकसित करुन विकण्यात आली. २०१७ पासून या जमिनीची विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू होते, असं म्हणत भाजप देखील यामध्ये सहभागी आहेत. कारण ते कारवाई करत नाहीत. कारण ते सत्तेत एकत्रित आहेत, असा आरोप विजय कुंभार यांनी केला.

# पत्रकारिता ही लोकशाहीच्या हिताची तलवार, तर सुरक्षेची ढाल

पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे सुध्दा.त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते.पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो.दिनांक २० फेब्रुवारी १८१२ ला बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म पोंभुर्ले देवगड,तालुका सिंधुदुर्ग येथे झाला व मराठी जगतात लखलखता तारा उदयास आला.मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ६ जानेवारी १८३२ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र जांभेकरांनी सुरू केले या दिनाचे स्मरण सर्वांना रहावे म्हणून ६ जानेवारी दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे ''द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म'' या रूपाने सुध्दा ओळखले जाते. जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखाण करने.कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी कोणाच्याच लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणनूच जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला ''चौथास्तंभ'' ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो. १९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते. तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते. पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविने. आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, मिडिया, फ ेसबुक, सोशल मीडिया, ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात ''चौथास्तंभ''.पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात ''पत्रकारितेची शैली''. पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण(धारधार) लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते.



आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे, चंद्र-सुर्य, चंद्रयान यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी ''दर्पण'' नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे ''दर्पण'' हे मराठीतील ''पहिले वृत्तपत्र''होय. त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी ''दर्पण''मध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा ''संवाद कौमुदी'' टिळक-आगरकरांचा मराठा व केसरी गणेश शंकर विद्यार्थी यांचा प्रताप डॉ बाबासाहेब आंबेडकर याचे ''मुकनायक'' ही सर्व वृत्तपत्रे ''आर्थीक तोटा'' सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे. आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही इजा होऊ दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. ६ जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम. जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# कृषी विज्ञान केंद्रात विकसित भारत रोजगार हमी मिशनबाबत चर्चासत्र संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : येथील कृषी विज्ञान केंद्रात आज 'विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन(ग्रामीण)' अंतर्गत ग्रामस्तर लोकप्रतिनिधींसोबत चर्चासत्र व सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शकाव्दारे शासनाच्या योजना, नवीन तंत्रज्ञान, शेतीविषयक अडचणीवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर भारसाकळे उपस्थित होते. तसेच सरपंच, हातेडी (खु.) प्रशांत गाडे, सरपंच चौथा गजानन गायकवाडसह पंचक्रोशीतून सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपातळीवरील समितीचे सदस्य तसेच शेतकरी उत्पादक कंपनीचे सदस्य उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना शिवशंकर भारसाकळे यांनी विकसित भारत कार्यक्रमांतर्गत ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नवीन स्वरूप असलेल्या विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेची सविस्तर माहिती दिली. या योजनेमुळे ग्रामीण भागातील विकासकामांना चालना मिळून रोजगाराच्या संधी निर्माण होतील व ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. अमोल झापे यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या शेतकरी-केंद्रित उपक्रमांची माहिती दिली. व्ही.बी. जी. रामजी या नव्या रोजगार हमी योजनेबाबत कृषी विज्ञान केंद्राने जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जनजागृती केल्याचे त्यांनी नमूद केले. या योजनेअंतर्गत शेतीसंबंधित विविध कामे दर्जेदार पद्धतीने राबवून ग्रामीण भागात रोजगाराची निश्चित हमी उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राशी जोडले जाऊन नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा व शेतीविषयक अडचणी असल्यास निःसंकोच संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मनेश यदुलवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

## धाडजवळ भीषण अपघात : एसटी बसदुचाकी समोरासमोर धडक, तिघांचा जागीच मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगरकडून मलकापूरकडे जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने तिघा युवकांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास धाडजवळील करडी पुलावर घडली. मलकापूर आगाराची एसटी बस छत्रपती संभाजीनगर येथून मलकापूरकडे जात होती. याच वेळी बुलढाणा तालुक्यातील ढालसावंगी येथील



अंकुश पाडळे, रवी चंदनशे आणि कैलास शिंदे हे तिघे दुचाकीवरून धाडहून करडीच्या दिशेने जात असताना करडी पुलावर दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. या धडकेत दुचाकीचा अक्षरशः चुराडा होऊन ती बसखाली अडकली. या अपघातात तिघांनाही गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी मोठी गर्दी केली असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह पुढील तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. या भीषण अपघातामुळे ढालसावंगी गावावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## सैनिक कल्याण विभागातील लिपिक टंकलेखक पदांसाठी मुदतवाढ; ऑनलाईन अर्जासाठी पर्यायी वेबलिंक व QR कोड उपलब्ध

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत सरळसेवेने भरण्यात येणाऱ्या लिपिक टंकलेखक (गट-क) पदांच्या भरतीसाठी दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार तसेच दि. ०७ डिसेंबर २०२५ च्या शुद्धीपत्रकानुसार उमेदवारांना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाच्या संकेतस्थळावर वेबलिंक उपलब्ध करून देण्यात आली होती.

मात्र, सैनिक कल्याण विभागाचे संकेतस्थळ तांत्रिक कारणामुळे दि. २६ डिसेंबर २०२५ पासून निष्क्रीय झाल्याने इच्छुक उमेदवारांना अर्जासाठी आवश्यक असलेल्या वेबलिंकपर्यंत पोहोचणे शक्य झाले नाही. ही अडचण लक्षात घेता उमेदवारांच्या सोयीसाठी अर्ज सादर करण्यासाठी पर्यायी वेबलिंक व QR कोड (https://cdn3.digialm.com/EForms/configuredHtml/32786/96173/Index.html) उपलब्ध करून देण्यात आला आहे.

त्यानुसार, उमेदवारांनी खाली दिलेल्या वेबलिंक किंवा QR कोडचा वापर करून आपले ऑनलाईन अर्ज सादर करावेत. तसेच, ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी अंतिम मुदत वाढविण्यात येऊन दि. ९ जानेवारी २०२६ रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार असल्याची माहिती सैनिक कल्याण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित कालावधीत अर्ज सादर करावे, असे आवाहन सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## शिवीगाळ, कॉलर पकडून धमकीष्ठ गौतम गंभीरच्या रागाने एका खेळाडूचं करिअरच संपवलं! कोण आहे तो क्रिकेटपटू?

**मुंबई /प्रतिनिधी** : क्रिकेटच्या मैदानावर खेळाडू आणि प्रशिक्षकांमध्ये वाद होणे काही नवीन नाही. सध्या भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक असलेले गौतम गंभीर हे वरिष्ठ खेळाडूंशी मतभेदांमुळे अलीकडेच चर्चेत आले होते. मात्र, गंभीर यांचे नाव वादात अडकण्याची ही पहिलीच वेळ नव्हती. माजी भारतीय क्रिकेटपटू मनोज तिवारी यांच्या मते, गौतम गंभीर यांच्याशी झालेल्या मतभेदांचा थेट फटका त्यांच्या कारकिर्दीलाही बसला.

## तक्रारी निकाली काढून नागरिकांना न्याय द्यावा - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

### जिल्हास्तरीय लोकशाही दिनात ८ तक्रारी दाखल



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : नागरिकांच्या तक्रारी निवारणासाठी लोकशाही दिन एक सशक्त माध्यम असून जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये नागरिक विविध विभागांच्या संबंधीत तक्रारी दाखल करीत असतात. या तक्रारींवर विहीत कालावधीत कार्यवाही होवून तक्रारींचा निपटारा करावा. तसेच तक्रारी निकाली काढून नागरीकांना न्याय द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात लोकशाही दिनाचे आयोजन ५ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांचे विभागप्रमुख, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये एकूण ८ तक्रारी प्राप्त झाल्या असून सामान्य तक्रारींमध्ये समाविष्ट करण्यात आल्यात. या लोकशाही दिन कार्यवाहीला संबंधित यंत्रणांचे अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

## अमृतसरमध्ये थरार! लग्नमंडपात घुसून 'आप' नेत्याची डोक्यात गोळी झाडून हत्या; अवघ्या १३ सेकंदात आरोपी पसार

चंदीगड : पंजाबमध्ये गुन्हेगारांचे मनोबल किती वाढले आहे, याचा प्रत्यय देणारी एक धक्कादायक घटना अमृतसरमध्ये घडली आहे. आम आदमी पार्टीचे सरपंच झरमल सिंग यांची एका लग्न समारंभात घुसून हत्या करण्यात आली. आता या घटनेचे अत्यंत भयानक सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून, राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या खळबळजनक हत्येची जबाबदारी कुख्यात गँगस्टर डोनी बल, प्रभ दासुवाल आणि देवेंद्र बंबीहा ग्रुपने घेतली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी या कृत्याची कबुली दिल्याचे समजते. गँगस्टर राजवटीमुळे पंजाबमधील सामान्य जनता आणि लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

समोर आलेल्या फुटेजमध्ये दिसते की, सरपंच झरमल सिंग लग्नात एका टेबलवर निवांत बसलेले आहेत. त्याच वेळी दोन सशस्त्र तरुण तिथे पोहोचतात. काहीही समजण्यापूर्वीच ते अत्यंत जवळून झरमल सिंग यांच्यावर गोळ्या झाडतात. गोळी लागताच सिंग खाली कोसळतात आणि हल्लेखोर शस्त्रांसह आरामात तिथून पसार होतात. ही संपूर्ण घटना काही सेकंदात घडली असून तिथे उपस्थित पाहुणेही स्तब्ध झाले होते.

शिरोमणी अकाली दलाचे नेते सुखबीर सिंग बादल यांनी पंजाब सरकारला धारेवर धरले आहे. ''पंजाबमध्ये सध्या सार्वजनिक ठिकाणी हत्या होणे ही सामान्य बाब झाली आहे,'' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. बादल यांनी ट्विटरच्या माध्यमातून सरकारवर टीकास्त्र सोडले. ''सरपंच झरमल सिंग यांची हत्या ही एक अत्यंत चिंताजनक घटना आहे. पंजाबमध्ये गेल्या काही दिवसांपासून सातत्याने रक्ताचा खेळ सुरू आहे. काल मोगामध्ये एका तरुणाची गोळी मारून हत्या करण्यात आली, तर शुक्रवारी कपूरथला येथे एका महिलेला लक्ष्य करण्यात आले. राज्यात 'टार्गेट किलिंग'चे सत्र सुरू असून जनता असुरक्षित आहे,'' असे बादल यांनी म्हटले आहे. या परिस्थितीला थेट मुख्यमंत्री भगवंत मान जबाबदार असल्याचा आरोप बादल यांनी केला. ''पंजाबचे गृह मंत्रालय स्वत: मुख्यमंत्र्यांकडे आहे, तरीही राज्यातील पोलीस यंत्रणा गुन्हेगारांना रोखण्यात पूर्णपणे अपयशी ठरली आहे. सार्वजनिक ठिकाणी दिवसाढवळ्या होणाऱ्या या हत्या पोलीस प्रशासनाच्या विदारक स्थितीचे दर्शन घडवतात. या प्रत्येक रक्ताच्या थेंबाला आणि कायदा-सुव्यवस्थेच्या चिंधड्यांना मुख्यमंत्री जबाबदार आहेत,'' अशी घणाघाती टीका त्यांनी केली.


## शब्दकोडे क्र. 55

आडवे शब्द

१. पुरी फजिती, बोऱ्या ४. नुकतीच आशिया करंडकाचा अंतिम सामना या दोन देशात झाला ९. सापाने टाकलेली त्वचा ११. पृथ्वी १३. अंत:करण १४. मोराचे ओरडणे, मोरोपंतांचा काव्यसंग्रह १६. स्पष्टवक्ता १७. रम्य १९. श्वासाचा अवयव २०. आत काहीही नसलेले, फोल २१. एक दातेरी हत्यार २३. स्वच्छ २४. वृक्ष, झाड २६. टरफलासहित तांदूळ २७. सरस, अधिक श्रेष्ठ ३०. पदोपदी ३२. धडधड ३४. ममता, प्रेम, धन ३५. आंब्याची पोळी ३६. सर्वस्व ३८. आजच्या आधीचा दिवस ३९. सदोदित ४१. चेहरा, मुख ४२. अदृश्य ४३. सोने ४५. परिस्थिती ४७. निवासस्थान ४८. भीती ५०. कारस्थान ५१. अर्धवर्तुळाकृती ५४. गाय ५५. भाषांतर करणारा ५७. खडकाची जमीन ५९. पोपट ६०. लेखणी ६१. शहर, गाव ६३. प्रवासातील टप्पा ६४. पातळ खांब ६५. कर्जाचा बोजा, वजन ६६. माफी ६७. कपाळभर लावलेले कुंकू ६८. घराणे ७१. अमली, कैफी ७२. वेदना ७३. बांगड्या भरण्याचा व्यवसाय करणारा ७५. माणशी प्रमाण ७७. नवा कोरा ७९. जमीनदोस्त ८०. मखर

उभे शब्द

१. नेस्तेज, पांढरेधोप २. चुणचुणीत, सुंदर मुलगी ३. नदीचा काठ, बाण ५. सुंदर तरुणी ६. पुत्र, मुलगा ७. रावण, लंकेचा राजा ८. चुलता १०. तात्काळ, लगेच कारवाई १२. रेचक १५. पहिला ऋतू १८. 'भाजे' लेणी या गावाजवळ आहेत १९. अमेरिकेचे अंतराळ संशोधन केंद्र २०. लाटण्याच्या साथीदार २१. पाण्याला आलेली उकळी २२. रंग २५. भारतीय चलन २६. वर्षानुवर्षे २८. हालचाल २९. पवित्र, साखरेचे दाट पाणी ३१. खोदकाम ३२. मेंढपाळ ३३. प्रयत्न ३४. वाजवी, योग्य ३७. हत्तीच्या गंडस्थळातील स्त्राव ३८. कावळा ३९. मनाला टोचणारे दु:ख ४०. जळजळीत, जाळणारे ४४. फायदा, तोटा ४५. सोने ४६. पत्नी, सुंदर स्त्री ४९. पहारेकरी ५०. पाऊल (हिंदी) ५२. प्रमाणपत्र ५३. विपत्तीची कहाणी ५६. एक द्विदल धान्य ५८. अंजनाचा एक प्रकार ५९. गवंडी ६१. मवाळ धोरण ६२. रक्षण करणारा ६३. जुगाराचा एक प्रकार ६४. स्तुती ६७. मळलेली ६९. नवरा (ग्रा.) ७०. पुरुष ७२. पिकांवरील एक रोग, करपलेला भाग ७४. शर्करा ७६. मस्तक ७७. सत्त्व ७८. अंधार



### शब्दकोडे क्र. 54 चे उत्तर

आडवे उत्तर

१.नंतर ३.नामकरण ६.भुजंग ९.जलाशय ११.सनई १३.वर्तन १४.ईश १५.तरुवर १८.वासलात १९.लव २२.पारवा २३.सोम २५.तनयतनया २८.नवकोटनारायण ३२.वानर ३३.कार ३४.रोगी ३५.सम ३६.सदा ३७.कलकलाट ३९.नकलाकार ४१.रचना ४२.रखरख ४३.क्षालन ४७.तणतण ४९.तार ५०.लाजरी ५१.दिनांक ५२.रीतसर ५३अ.जल ५४.उकीडवा ५५.सतत ५७.पलंग ५८.राजकुमार ६०.मणेर ६१.परका ६३३.वार्ताहर ६५.टमटम ६६.दम ६७.कटकट ६९.रवाना ७१.कणीदार ७३.पाया ७४.कला ७६.नयन ७८.करतल ७९.पातक ८०.थप्पी ८१.वहाण

उभे उत्तर

१.नंदीबैल २.रजई ३.नाश ४.मयत ५.रमावर ६.भुईसपाट ७.गवत ८.धन १०.लाश १२.नवा १६.रुपाया १७.रवानगी २०.वतनदार २१.गतकाल २३.सोय २४.मणका २६.नर २७.नरक २९.कोरा करकरीत ३०.नासका ३१.रामरक्षा ३२.वास ३४.रोट ३७.कनात ३८.लामणदिवा ३९.नख ४०.लाख ४२.रसकसणे ४४.लता ४५.नरमगरम ४६.निलाजरा ४८.तास ५०अ.जलज ५३.रपका ५४.उमा ५४अ.कीरवा ५६.तरट ५९.कुमक ६०.मरवा ६१.पटकन ६२.रमणीय ६४.हरकत ६६.दर ६७.कलंक ६८.टपाल ७०.नाक ७२.दानव ७५.लाथ ७७.व्रण

वृत्तविशेष...

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती किनगाव जट्टू येथे साजरी



**किनगाव जट्टू/प्रतिनिधी** : किनगाव जट्टू येथे फुलेशाहूआंबेडकर विचार मंचाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद मुलींच्या शाळेत उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांना वही, पेन तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुलींच्या शाळा समितीचे अध्यक्ष नारायण राऊत होते. प्रमुख उपस्थितीत शाळा समिती उपाध्यक्ष सचिन मुळे, मुलांच्या शाळा समिती अध्यक्ष विकास मुंडे, मुख्याध्यापक काकड सर, शिक्षक पवार सर, ग्रामविकास अधिकारी विनोद सातपुते, फुलेशाहूआंबेडकर विचार मंचाचे अध्यक्ष राजेश नागरे, पालक लक्ष्मण वाघमारे, नागेश सोनुने यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षकवर्ग व विचार मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## १४ व १९ वर्षांखालील मुलींच्या हॉकी संघाचे प्रशिक्षण शिबिर संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा, जिल्हा क्रीडा परिषद बुलढाणा तसेच सहकार विद्या मंदिर बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने १४ व १९ वर्षांखालील मुलींसाठी हॉकी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर दि. २७ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत बुलढाणा येथील सहकार विद्या मंदिराच्या आधुनिक एस्ट्रो टर्फ मैदानावर उत्साहात पार पडले.

या प्रशिक्षण शिबिरात निवड झालेल्या दोन्ही वयोगटातील संघ दि. १ जानेवारी २०२६ रोजी मध्यप्रदेश येथील ग्वालियर येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी रवाना झाले. ज्योती चव्हाण व वैशाली सूड यांच्या मार्गदर्शनाखाली सराव देण्यात आला.

संघ रवाना होण्यापूर्वी आयोजित शुभेच्छा कार्यक्रमात सहकार विद्या मंदिरच्या चेअरमन कोमल झंवर, प्राचार्य अलगर स्वामी, जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, लक्ष्मी शंकर यादव, मुख्याध्यापिका श्रीमती ससे, हॉकी प्रशिक्षक सय्यद आबीद तसेच संघ व्यवस्थापक डॉ. जीवन मोहोळ यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या प्रशिक्षण शिबिरामुळे जिल्ह्यातील महिला हॉकी खेळाडूंना दर्जेदार सरावाची संधी मिळाल्याने त्यांच्या कामगिरीत निश्चितच सुधारणा होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## आसाममध्ये भल्या पहाटे भूकंप! नागरिकांची उडाली धावपळ

गुवाहाटी : आसाममधून एक मोठी बातमी समोर आली आहे. आसामच्या मोरीगाव जिल्ह्यात आज पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.१ इतकी नोंदवण्यात आली असून, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही. मात्र अचानक बसलेल्या हादऱ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून अनेकांची झोपेतूनच धावपळ उडाली. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, भूकंपाचे केंद्र २६.३७ अंश उत्तर अक्षांश आणि ९२.२९ अंश पूर्व रेखांशावर होते. हा भूकंप जमिनीखाली सुमारे ५० किलोमीटर खोलीवर झाला. पहाटेच्या शांततेत जोरदार धक्का बसल्याने अनेक नागरिक घाबरून घराबाहेर पडले आहेत.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपामुळे कोणत्याही प्रकारचे जीवित किंवा मोठ्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचे तात्काळ वृत्त नाही. मात्र मध्य आसाम च्या काही भागांमध्ये सौम्य ते मध्यम स्वरूपाचे हादरे नागरिकांना जाणवले. भूकंपाच्या वेळी अनेक नागरिक झोपेत असल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, आसामसह मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि ईशान्य भारतातील इतर काही भागांमध्येही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असल्याची माहिती आहे. मात्र हे हादरे तीव्र नसल्याने फारसा धोका निर्माण झाला नाही. प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवले असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मेहकर तालुक्यात १९ हजार ६१६ घरकुलांना मंजुरी

## ५ हजार ८२७ घरकुल पूर्ण तर १३ हजार ७०० प्रगतीत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील मेहकर तालुक्यामध्ये विविध आवास योजनांअंतर्गत मोठ्या प्रमाणावर घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. आतापर्यंत विविध आवास योजनेंतर्गत१९ हजार ६१६ घरकुले मंजूर असून त्यापैकी ५ हजार ८२७ घरकुले पुर्ण झालेले आहेत. उर्वरित १३ हजार ७०० घरकुल प्रगतीत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत टप्पा१ मध्ये २ हजार ७८४ व टप्पा-२ मध्ये ११ हजार २७७ अशी एकूण १४ हजार ०६१ घरकुले मंजूर असून त्यापैकी २ हजार ९४५ घरकुले पुर्ण झाले असून ११ हजार ११६ घरकुले सध्या प्रगतीपथावर आहेत.

रमाई आवास योजनेअंतर्गत २ हजार ४८७ घरकुलांचे उद्दिष्ट असून त्यापैकी १ हजार ५९७ घरकुले पूर्ण झाली आहेत व ८९० घरकुले प्रगतीत आहेत. शबरी आवास योजनेअंतर्गत १ हजार ०१२ घरकुलांचे उद्दिष्ट असून ३९५ घरकुले पूर्ण झाली आहेत.

५९८ घरकुले बांधकामाच्या विविध टप्प्यात आहेत. पारधी आवास योजनेमध्ये ३२ उद्दिष्टांपैकी ३१ घरकुले पूर्ण झाली असून १ घरकुल प्रगतीत आहे. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत ६१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. अशा प्रकारे मेहकर तालुक्यात विविध आवास योजनांअंतर्गत एकूण १९ हजार ६१६ घरकुले मंजूर असून त्यापैकी ५ हजार ८२७ घरकुले पूर्ण झाली आहेत, तर १३ हजार ७०० घरकुले प्रगतीत आहेत.

मेहकर तालुक्यातील सर्व घरकुल लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाच्या बांधकामाच्या सद्यस्थितीनुसार संबंधित ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामरोजगार सेवक यांच्याशी समन्वय साधून पुढील हप्त्याची मागणी विहित नमुन्यात नेमून दिलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता अथवा घरकुल कक्षाकडे सादर करावी.



यामुळे घरकुलाचे फोटो आवास योजनेच्या संकेतस्थळावर वेळेत अपलोड होऊन हप्त्याचे वितरण विनाविलंब होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, घरकुल योजनेच्या अनुषंगाने कोणीही लाभार्थ्यांकडे पैशांची मागणी केल्यास, संबंधितांनी तात्काळ लेखी तक्रार लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे सादर करावी, असे स्पष्ट आवाहन गट विकास अधिकारी, पंचायत समिती मेहकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव



**बेलगाव** येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ३ जानेवारी २०२६) विनम्र अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा आलेख आपल्या भाषणातून प्रभावीपणे मांडला. इयत्ता सातवीची विद्यार्थिनी कल्याणी गोपाल वानखेडे तसेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनी श्रेया अमोल गवळी, जानवी विश्वनाथ वानखेडे व जयश्री इंगळे यांनी आपले विचार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यानंतर विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक सन्माननीय कावरखे सर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणक्षेत्रातील अमूल्य योगदानाची माहिती देत समाजाकडून त्यांना सहन करावा लागलेल्या छळाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच गणित विषयाचे शिक्षक वानखेडे सर यांनी सावित्रीबाईंचा जीवनपट उलगडून सांगत त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय दीपक कुटे सर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल जायभाये सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन विनोद मेटांगळे सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कावरखे सर, वानखेडे सर, गीते सर, मेटांगळे सर, रहाटे सर, जायभाये सर, गायकवाड सर, साखरे सर, खुशालराव मेटांगळे सर, विजय दाभाडे, पुनम वानखेडे, गजानन देशमुख, मधुकर कांबळे यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महारचिकना येथे बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा



दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना** : ३ जानेवारी रोजी लोणार तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महारचिकना येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बाल आनंद मेळाव्याचे आयोजन केले होते. सदरील कार्यक्रमासाठी गावचे सरपंच आदरणीय शिवाजीरावजी ढाकणे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उद्धवरावजी ढाकणे, मुख्याध्यापक पी.डी. अंभोरे यांच्या उपस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच बाल आनंद मेळाव्याची फीत कापून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

जिल्हा परिषद शाळेमधील मुलांना व्यवहारज्ञान, खरेदी विक्री नफा तोटा मालांची जाहिरात ग्राहकांशी संवाद कौशल्य इत्यादी उद्दिष्टे शाळेने समोर ठेवून या बाल आनंद मेळाव्याचेआयोजन केले होते. बाल आनंद मेळाव्यामध्ये प्रेमाचे पेढे, प्रीतीचा लाडू,हर्षची पाणीपुरी मयूरचे बटाटा पोंगे समीक्षेचा गोड संत्रा, समर्थ ची पाणीपुरी, यश चे गुलाबजाम, प्राची ची चंपाकली,रियाचे पॅटीस, अनुरागचा चिवडा, यश कबले खट्टे मीठे संत्रा, शौर्यचा मेदुवडा, आनंदचा साबुदाणा वडा, अश्विनीचाआलू पराठा असे असंख्य पदार्थांची रेलचेल गावकऱ्यांनी अनुभवली. गावातील ज्येष्ठ नागरिकांनी सुद्धा सदरील कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली. गावातील आजीबाईंनी सुद्धा पाणीपुरीचा आस्वाद पॅटीसचा आस्वाद



घेतला.

गावातील पालक आदरणीय बद्रीनारायण गावडे,नागेश घुगे अनिल ढाकणे, विशाल सदावर्ते गजानन हरणे, रामेश्वर तांदुळे, व गावातील नागरिकांनी तसेच सर्व तरुण मुला-मुलींनी उपस्थिती दर्शवून मुलांनी बनवलेल्या सर्व पदार्थांचा आस्वाद घेतला. गावातील सर्व नागरिकांनी विद्यार्थ्यांची संवाद कौशल्य तसेच खरेदी विक्री बघून थक्क झाले व शाळेच्या अशा उपक्रमशील प्रगती बाबत समाधान व्यक्त केले.

सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्री पी.डी .अंभोरे सर, श्री. कृष्णा सिल्लोडे सर, श्री बालाजी लोखंडे सर, श्री क्षीरसागर सर, तसेच सौ प्रणिता मॅडम यांनी मेहनत घेतली.

## नाशिक छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात तज्ज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती; मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन



**बुलढाणा/प्रतिनिधी** : युपीएससीमार्फत घेण्यात येणाऱ्या Combined Defence Services (CDS) Examination-2026 च्या तयारीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे तज्ज्ञ प्राध्यापकांची तातपुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे. इच्छुक तज्ज्ञ प्राध्यापकांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन आवाहन सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

तज्ज्ञ प्राध्यपकांची नियुक्ती ३०० रुपये प्रती तासिका या मानधनावर करण्यात येणार आहे. प्रशिक्षण कालावधी सीडीएस-६६ कोर्ससाठी दि. १९ जानेवारी ते ३ एप्रिल २०२६ तर सीडीएस-६७ कोर्ससाठी दि. १५ जून ते २८ ऑगस्ट २०२६ राहिल. इंग्रजी, गणित, सामान्य विज्ञान-(सामान्य ज्ञान, भूगोल, इतिहास, भारतीय राजकारण) तसेच सामान्य विज्ञान-(अर्थशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) या विषयांमध्ये तज्ज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्राध्यापक पदसाठी शैक्षणिक अर्हता संबंधित विषयातील पदवीधर अथवा पदव्युत्तर तज्ज्ञ प्राध्यापक असणे आवश्यक असून, स्पर्धा परीक्षांच्या अध्यापनाचा किमान दोन वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

अर्हता पूर्ण करणाऱ्या तज्ज्ञ प्राध्यापकांनी संपूर्ण कागदपत्रांसह दि. ९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मुलाखतीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नाशिक रोड, नाशिक येथे उपस्थित राहावे, असे आवाहन ले. कर्नल विलास शंकर सोनवणे (नि.), प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९१५६०७३३०६ किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ संपर्क साधावा, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त बेलगाव येथे बाल आनंद मेळावा उत्साहात

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव** : बेलगाव येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिल्हा परिषद मराठी-उर्दू प्राथमिक शाळा, बेलगाव येथे ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व बालिका दिनानिमित्त बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्जुनराव वानखेडे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. त्यानंतर बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

या आनंद मेळाव्यात पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल उभारले होते. विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, भजी, जिलेबी, जांभूळ यासह अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ विक्रीस ठेवले होते. गावातील महिला व पुरुषांनी या पदार्थांचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, आत्मविश्वास व व्यवहारज्ञान वाढावे या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वयंपूर्णपणे स्टॉलचे





नियोजन व व्यवहार सांभाळत आपली चुणूक दाखवली. या कार्यक्रमास जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रुद्र सर, खवाल सर, राऊत सर, अंभोरे मॅडम, होमेरा मॅडम, जामकर सर, पिंपळकर सर, तसेच उर्दू शाळेचे शिक्षक, जिल्हा परिषद शाळेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद शाळेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.